जा. क्र. : माध्य-३/प्रथम मान्यता/पुणे
विभाग/१९९.
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे - १. यांचे कार्यालय.
दिनांक :
07 FEB 1994

प्रति,

शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद, ---------------. पुणे

विषय - प्रथम मान्यता

**माध्य. विद्या. टिटेघर ता. भोर**

संदर्भ - आपले पत्र जा. क्र. **शिक्षण/माध्य/इ-४/९२-९३**
**दिनांक १५/११/९३**

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३ अन्वये ------- **राजगड ज्ञानपीठ भोर** ------- संस्थेच्या ------- **मराठी** ------- माध्यमिक शाळेच्या इ. ८वी/ ~~९वी~~ /~~१०वी~~ च्या वर्गास सन १९ - **१९९२-९३** या शैक्षणिक वर्षासाठी जुन **१९९२** पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठविताना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावा सोबत पाठविण्यात यावा.

1] संस्थेने मालकीची शैक्षणिक दृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी.
2] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
3] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करून द्यावी.
4] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
5] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.
6] पुरेसा प्रशिक्षित वर्ग उपलब्ध करून द्यावा.
7] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करून द्यावी.
8] वाढीव फीचे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कडून मंजूर करून घ्यावेत.
9] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
10] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
11] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
12] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
13] **अध्यापनात शै. साधनांचा वापर करावा**
14] **विद्यार्थी संख्या वाढवावी.**

स्थळप्रतीवर शि. उ. स. यांची
सही असे

**प्रत :-**
**मुख्या.**
**माध्य. विद्या. टिटेघर, ता. भोर.**

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे - १.

मु. [illegible]
राजगड ज्ञानपीठ भोर, संचलित
रायरेश्वर विद्यालय टिटेघर
ता. भोर जि. पुणे

Scanned with OKEN Scanner